# ‘जय जय रघुवीर समर्थ’चा जयघोष

## दासनवमीनिमित्त आगरटाकळीत पादुकापूजन ; वीस हजार भाविकांचे दर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

उपनगर, ता. ३ : आगरटाकळी येथील मारुती देवस्थान व रामदास स्वामी मठात दासनवमीनिमित्त भजन, पूजा, आरती, अभिषेक आदी धार्मिक विधी झाले. सकाळी अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे यांच्या हस्ते समर्थांच्या पादुका व कुबड्यांचे पूजन झाले. ऋतुजा नाशिककर यांचे समर्थ रामदास स्वामी यांच्या चरित्रावर गीतदासायण झाले. गोमय हनुमानाच्या दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या. या वेळी वीस हजार भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

टाकळी येथील मठास रोषणाई करण्यात आली. सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रम झाले. मठाच्या प्रवेशद्वारासमोर आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या. मठाला फुलांनी सजविण्यात आले. समर्थांनी आपल्या हस्ते गोमय हनुमानाची मूर्ती स्थापन केल्याने या क्षेत्राला विशेष धार्मिक महत्त्व आहे. दासबोध पारायणाचा





**आघरटाकळी : दासनवमीनिमित्त गुरुवारी समर्थ रामदास स्वामी यांच्या मठात भजन सादर करताना राजीवनगर येथील भजनी मंडळ. दुसऱ्या छायाचित्रात गोमय हनुमानाची सजविलेली मूर्ती.**

आज समारोप झाला. सकाळी नऊ ते साडेअकरादरम्यान पुणे येथील विजया भट व त्यांचे सहकारी यांचे भजन-कीर्तन झाले. दुपारी वैष्णवी भजन मंडळाच्या रोहिणी कुलकर्णी व सहकाऱ्यांनी समर्थांच्या जीवनावर भजने सादर केली. या वेळी महाप्रसादाचे वाटप झाले. सायंकाळी ‘दासनवमी टाकळी’ या विशेषांकाचे प्रकाशन झाले. ‘संत वेणाबाईंचे चरित्रकथन’ या विषयावर स्वाती पाठक यांचे व्याख्यान झाले. विक्रेत्यांनी रूईची माळ, नारळ, उदबत्ती, पेढे, फुटाणे यांची दुकाने थाटली होती. टाकळी संगम येथेही आज भक्तांची गर्दी झाली. श्रीरामाच्या जयघोषाबरोबर ‘जय जय रघुवीर समर्थ’ म्हणत सायंकाळपर्यंत मठात भक्तांची मांदियाळी होती. सुधीर शिरवाडकर, ज्योतिराव खैरनार, दिलीप कैचे, प्रकाश पवार, विजया माहेश्वरी, तहसीलदार नाशिक आदी विश्वस्तांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.